● शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १०४ वा ● किंमत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827





उत्तर भारतीय बांधवांच्या वतीने शहरातील छत्रपती संभाजी उद्यान तलाव परिसरात आयोजित करण्यात आलेल्या छटपूजा कार्यक्रमास जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांनी हजेरी लावत उपस्थीतांना छटपुजे निमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपा नेते भास्करराव दानवे, गणेश राऊत, विजय चौधरी, अर्जुन गेही, धनराज काबलीये, रोषन चौधरी, राधाकिसन दाभाडे आदींची उपस्थिती होती.
(छाया/जावेद तांबोळी)

## रविवारी शिक्षक पात्रता परीक्षेचे दोन सत्रात आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून प्राथमिक शिक्षक पदासाठी आवश्यक असलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेचे जालना येथे रविवार दि.१० नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजन करण्यात आले आहे. परीक्षा पेपर-१ साठी सकाळी १०.३० ते १ यावेळेत १० परीक्षा केंद्रावर तर पेपर-२ चे दुपारी २.३० ते ५ या वेळेत ११ परीक्षा केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार आहे. तरी शिक्षक पात्रता परीक्षेसाठी परीक्षार्थीनी उपस्थित रहावे, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील शिक्षक पात्रता परीक्षा जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय परीक्षा आयोजन व सनियंत्रण समिती अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हास्तरीय परीक्षा आयोजन व सनियंत्रण समिती उपाध्यक्ष वर्षा मिना यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली आहे. शिक्षक पात्रता परीक्षा जालना येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, श्री.सरस्वती भूवन प्रशाला, सी.टी.एम.के. गुजराथी विद्यालय, राष्ट्रीय हिंदी विद्यालय, आर.एच.व्ही. इंग्लिश स्कुल, सेंट मेरीज हायस्कुल, जिल्हा परिषद कन्या प्रशाला, नवयुवक गणेश प्राथमिक विद्यालय, एस.एम.एस. जैन हायस्कुल, रेयॉन इंटरनॅशनल स्कुल आणि जे.ई.एस. महाविद्यालय अशा एकुण ११ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे.

सकाळच्या सत्रात पेपर-१ साठी २ हजार ९३० तर दुपारच्य सत्रात पेपर-२ साठी ३ हजार २३७ उमेदवार परीक्षेला बसलेले आहेत. उमेदवारांना सकाळच्या सत्रात ९ ते १०.१० दरम्यान तर दुपारच्या सत्रात १ ते २.१० वाजेपर्यंत कालावधीत प्रवेश देण्यात येणार आहे. सर्व परीक्षा केंद्रातील हॉलमध्ये परिषदेने सीसीटिव्ही कॅमेरे लावलेले आहेत. तसेच जिल्हास्तरावर परीक्षा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून याद्वारे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी आवश्यक जिल्हा परिक्षक म्हणून उपशिक्षणाधिकारी शाम देशमुख यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तरी परिक्षार्थीनी स्वत: जवळ कोणत्याही प्रकारचे ईलेक्ट्रॉनिक साहित्य बाळगू नये. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## काँग्रेस नेते खा. गांधी यांची गुरुवारी जालन्यात सभा

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार कैलास गोरंटयाल यांच्या प्रचारार्थ दि. १४ नोव्हेंबर गुरुवार रोजी काँग्रेस पक्षाचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी यांची जालना शहरात जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. अखिल भारतीय काँग्रेस तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी



जालन्याचे मविआचे उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांच्याशी संपर्क साधून काँग्रेस पक्षाचे नेते खा. राहुल गांधी यांच्या सभे विषयी माहिती दिली आहे.

युवा आदर्श

## निशब्द ...

आधीचं मर्कट वृत्ती
त्यात पाजले मद्य
वादग्रस्त वक्तव्याने
रातोरात हो प्रसिद्ध
आमचे सर्व बरोबर
सांगाया होई सिध्द
विचार स्वातंत्र्य असे
कशास सोडूं जिद्द
येन केन प्रकारेण
फलीत करा साध्य
मुर्दाडल्या या मनाचे
आधी घातले श्राध्द
भडकू पाहे शांतता
विसरलो गांधी बुध्द
मोठे होण्याचे नादात
हरवून बसलो शुध्द
अशी विचीत्र विधाने
वेळेवरचं करावी रद्द
व्यक्ती स्वातंत्र्य नावा
ओलांडून जातो हद्द
कायदे नियम करतो
सांसदीय हवेत शब्द
बधीर बोलायं अधीर
संस्कृती होई निशब्द

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# घनदाट योजनेचे टेंभुर्णीत सहा हजार रोपे पडून

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** सामाजिक वनीकरण विभागाकडून तालुक्यात अनेक ठिकाणी घनदाट प्रकल्प राबविले जात आहे. यामध्ये टेंभुर्णी येथील मारोतराव देशमुख विद्यालय व गेस्ट हाऊसमध्ये घनदाट उपक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणात झाडे लावण्यात आली आहे. मात्र वनीकरण विभागाच्या उदासीनतेमुळे येथील गेस्ट हाऊसमधील आणखी २० गुंठे क्षेत्रावर लागवड करायच्या घनदाट प्रकल्पाला खोडा बसला आहे. यामुळे लागवडीसाठी आणलेली सहा हजार रोपे येथील गेस्ट हाऊस आवारात तशीच पडून आहे. दरम्यान, यावर्षी परिसरात जोरदार पाऊस पडूनही ही वृक्ष लागवड का केली गेली नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. येथील गेस्ट हाऊस परिसरातील काही क्षेत्रावर दोन वर्षांपूर्वी घनदाट प्रकल्पांतर्गत झाडे लावली गेली आहे. यावर्षी पुन्हा २० गुंठे क्षेत्रावर हा प्रकल्प राबवायचा होता. त्यासाठी पावसाळ्यापूर्वी जागेची साफसफाई केली होती. त्यावर लागवड करायचे दरम्यान, संपूर्ण तालुक्यात वृक्ष लागवडीला प्रोत्साहन मिळावे म्हणून सामाजिक वनीकरण विभाग काम करीत असते. मात्र या विभागाकडूनच वृक्ष लागवडीला अशाप्रकारे हरताळ फासला गेल्याने जनतेकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विविध जातीच्या वृक्षांची सहा हजार रोपे आणून ठेवली होती. मात्र पावसाळा संपला तरी वनीकरण विभागाला या वृक्षलागवडीसाठी अद्यापही मुहूर्त सापडला नसल्याचे दिसून येत आहे. यापूर्वी दोन वर्षाअगोदर येथील गेस्ट हाऊसमध्ये घनदाट अंतर्गत विविध प्रकारची झाडे लावण्यात आली आहे. मात्र या झाडांची मरळ भरली गेली नसल्याने अनेक ठिकाणी मृत झाडांची मोकळी जागा तशीच पडून आहे. याशिवाय या वृक्षामध्ये मोठ्या प्रमाणात गवत वाढल्याने वृक्ष वाडीला अडथळा निर्माण झाला आहे. याशिवाय या वृक्षांना पाणी देण्यासाठी ठिबक अंथरण्यात आले असले तरी अद्याप पाण्याची कुठलीही कायमस्वरूपी व्यवस्था येथे करण्यात आलेली नाही. यामुळे रोपांची मुळे जमिनीत गेल्याने आता ही रोपे काढतांना मोठे नुकसान होऊन लाखोंची ही रोपे वाया जाणार आहेत. याबाबत तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याशी वेळोवेळी मोबाइलद्वारे संपर्क केला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. एकीकडे शासन संपूर्ण राज्यभर वृक्ष लागवडीला प्रोत्साहन देत असताना टेंभुर्णी येथे राबवायच्या घनदाट प्रकल्पाबाबत असलेल्या या उदासीनतेची त्वरित चौकशी करण्याची मागणी जनतेतून होत आहे.

## जालन्यात आज दिपावली स्नेहमिलन

**जालना -** माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे व दानवे परीवाराच्या वतीने शुक्रवार दि. ०८ नोव्हेंबर २०२४ रोजी, सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेदरम्यान भारती लॉन्स, भोकरदन नाका बालाजी चौक, जालना येथे दिपावली स्नेहमिलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे व मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास सर्व समाजबांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन भास्कर दानवे यांनी केले आहे.




जनहितार्थ युवा आदर्श


# क्षमतेनुसार क्षेत्र निवडल्यास यश निश्चित मिळेल -प्रा. मंत्री

## माहेश्वरी समाजातर्फे गुणवंत विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

**जालना । प्रतिनिधी -** आपल्या आवडीचे व आपल्या क्षमतेनुसार क्षेत्र निवडल्यास हमखास यश मिळेल, असे प्रतिपादन हिंगोली येथील आदर्श विद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य जयनारायण मंत्री यांनी येथे बोलताना केले.

जालना माहेश्वरी समाजातर्फे आयोजित गुणवंतांच्या सत्कार सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून श्री. मंत्री बोलते होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नेत्रदान प्रोत्साहक अभय करवा हे होते. यावेळी प्रा. मंत्री पुढे म्हणाले की, पूर्वी करियरच्या जास्त संधी नव्हत्या. परंतु, आज आधुनिक काळात करियरच्या खुप संधी उपलब्ध आहेत. कोणतेही क्षेत्र लहान समजू नये, मार्क कमी असेलेतरी जीवनात तुम्ही विविध क्षेत्रात उंच भरारी घेऊ शकता, अवश्यकता असते ती फक्त कठोर परिश्रम, सातत्य, चिकाटी व जीद्दीची. असे कोणतेही क्षेत्र नाही की ज्यात तुम्ही प्रगती करु शकत नाहीत. यासंदर्भात त्यांनी विविध क्षेत्रातील यशस्वी व्यक्तिमत्व जसे दिवंगत राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम, गायक कार्तीकी गायकवाड, चित्रकार वासुदेव गायतोंडे, चित्रकार एम.एफ हसुन, गुरुप्रसाद त्रिपाठी, सी.ए. भुषण तोष्णीवाल, बबीता तांडे, नितीन राठी आदींची उदाहरणे देऊन यश कसे मिळते ते पटवून दिले.

गुणगौरव सोहळ्यात विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेल्या महानुभवांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थी, डिग्री धारक, डॉक्टर, इंजिनियर, एमबीए पदवीधारकांचा सत्कार करण्यात आला. कोण बनेगा करोडपती? च्या थीमवर विविध मोटीवेशन स्पीच, उधबोधनात्मक व्हिडीयो क्लीप, स्टोरी दाखवून कार्यक्रमात रंगत आणण्यात आली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. स्वप्नील सारडा यांनी केले तर आभार विनोद बियाणी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दामोधर बजाज, विजय गो. राठी, उमेश बजाज, प्रा. स्वप्नील सारडा, विनोद बियाणी, सतिष राठी, अमोल बांगड, नारायण बजाज, लक्ष्मीनारायण मानधना, जुगलकिशोर होलाणी, शिवप्रसाद गट्टाणी, सुनिल बियाणी, डॉ. आशुतोष सोनी, रामनिवास मुंदडा, शाम लखोटिया यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय पान

# ‘ट्रम्प सरकार’

जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या ६० व्या निवडणुकीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी चे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी अनपेक्षितपणे विजय मिळवला. अनेपेक्षित या अर्थाने म्हणतो की या निवडणुकीत त्यांच्या प्रतिस्पर्धी डेमॉक्रटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांनाही विजयाचे दावेदार समजले जात होते. या निवडणुकीत दोघांच्यातही जोरदार रस्सीखेच होती. निवडणूकपूर्व सर्वेक्षणात दोन्ही उमेदवारात काटे की टक्कर दाखवण्यात आलो होती. दोन्ही उमेदवारांची जिंकण्याची शक्यता पन्नास पन्नास टक्के व्यक्त करण्यात आली होती. जो जिंकून येईल तो अगदी काट्यावर निवडून येईल असे मानले जात होते त्यामुळेच ट्रम्प इतक्या घवघवीत मतांनी जिंकून येतील असे कोणालाही वाटले नव्हते. ट्रम्प यांनी तब्बल २७७ इलेक्ट्रोल मत मिळवत कमला हॅरिस यांचा दारुण पराभव करत अमेरिकेत फिर एक बार 'ट्रम्प सरकार' आणले. फिर एक बार असे मी म्हणालो कारण २०१६ ते २०२० असे चार वर्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार अमेरिकेत होते. २०२० साली म्हणजे मागील निवडणुकीत त्यांचा ज्यो बायडेन यांनी दारुण पराभव केला होता. यावेळी मात्र त्यांनी त्या पराभवाचे पुरेपूर उट्टे काढले आणि अमेरिकेवर पुन्हा एकदा स्वतःचे वर्चस्व सिद्ध केले. अर्थात त्यांचा हा विजय का झाला हे देखील तपासून पहावा लागेल. डोनाल्ड ट्रम्प यांनी आक्रमक प्रचार करताना अमेरिका फर्स्ट या धोरणाचे जोरदार समर्थन केले. डोनाल्ड ट्रम्प हे कट्टर उजव्या विचारसणीचे आहेत त्यांनी आपल्या प्रचारात हा मुद्दा जोरदारपणे मांडला. आपल्या देशातील सम स्यांना अन्य देशातून आलेले स्थलांतरित जबाबदार आहेत. ज्यो बायडेन यांच्या काळात अन्य देशातून अनेक लोक अमेरिकेत आले त्यामुळे अमेरिकेतील स्थानिक नागरिकांचा रोजगार हिरावला गेला असा जोरकस प्रचार त्यांनी केला त्यांचा हाच प्रचार त्यांच्या पथ्यावर पडला आणि तरुणांनी त्यांना भरभरून मते दिली. त्यांनी केलेला आयातीला विरोध आणि आयात उत्पादनावर कर वाढवण्याची केलेली घोषणा ही मतदारांना पटली. अमेरिकने अन्य देशांच्या भांडणात पडण्याची गरज नाही हे त्यांचे मतही जनतेला पटले. तसेच त्यांचा चीन आणि रशियाला असलेला विरोध जगजाहीर आहे. अमेरिकेला मागे सारून चीन जागतिक महासत्ता होऊ पाहत आहे आणि त्यांना रशिया सहाय्य करत असताना ज्यो बायडेन हातावर हात ठेवून बसले आहेत असे चित्र गेली चार वर्ष दिसत होते. चीन आणि रशियाच्या वाढत्या वर्चस्वाला शह द्यायचा असेल तर डोनाल्ड ट्रम्प सारखा आक्रमक नेताच देशाचा राष्ट्राध्यक्ष हवा असे मत अमेरिकन नागरिकांचे बनले त्यात रशिया - युक्रेन आणि इस्राईल - पॅलेस्टाईन युद्धात बायडेन यांनी स्वीकारलेले बोटचेपे धोरण मतदारांना रुचले नाही म्हणूनच अमेरिकन मतदारांनी पुन्हा एकदा ट्रम्प यांच्या हाती सत्ता दिली आणि कमला हॅरिस यांना नाकारले. कमला हॅरिस यांनी ट्रम्प यांना जोरदार टक्कर देण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांना प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही ज्यो बायडेन यांनी खूप उशिरा त्यांची उमेदवारी घोषित केली त्यामुळे त्यांना प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. कम ला हॅरिस यांचा पराभव हा ज्यो बायडेन यांच्यामुळेच झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण ज्यो बायडेन यांची चार वर्षाची कारकीर्द निराशाजनक अशीच होती. अमेरिकेतील सर्वात निष्क्रिय राष्ट्राध्यक्ष अशी अमेरिकेच्या इतिहासात त्यांची नोंद होईल इतकी निराशाजनक कामगिरी त्यांची होती. महागाई, बेरोजगारी, शस्त्र संस्कृती याबाबत त्यांनी दिलेले एकही आश्वासन त्यांना पूर्ण करता आले नाही. बेकायदेशीर स्थलांतरितांचा प्रश्न त्यांना व्यवस्थित हाताळता आला नाही त्यामुळे तरुणांमध्ये त्यांच्या विषयी रोष होता तो त्यांनी मतपेटीतून व्यक्त केला.



सगळ्यात महत्वाचे म्हणजे २१ व्या शतकातही अमेरिकेन नागरिक एका कृष्णवर्णीय महिलेला राष्ट्राध्यक्ष म्हणून स्वीकारण्यास तयार नाही या आणि यासारख्या अनेक कारणांमुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय सोपा झाला आणि ते पुन्हा एकदा फिर एक बार 'ट्रम्प सरकार' म्हणत सत्तेवर आले.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

---

### नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व जेबीके विद्यालय टेंभुर्णी २९ वर्षानंतर भरली शाळा

# १९९५ च्या बॅचचा स्नेहउत्सव साजरा



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** टेंभुर्णीच्या नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती जेबीके विद्यालय टेंभुर्णीच्या इयत्ता दहावीच्या १९९५ च्या बॅचच्या सर्व विद्यार्थ्यांनी २९ वर्षांनी पूर्ण शाळा भरवली. त्या उत्सवास त्यांनी स्नेह उत्सव म्हणून नामकरण दिले. शाळेतील त्या ताज्या आठवणी म नाच्या कोपऱ्यात कुठेतरी साठवून ठेवलेल्या आहेत आणि त्या ताज्या आठवणी जशाच्या तशा पुन्हा अनुभवात म्हणून, त्या काळातील आठवणी म्हणजे शाळेत गणवेश घालून शिस्तीत जाणून, पोट दुखत म्हणून शाळेला दांडी मारणार, इंग्रजी आणि गणिताच्या तासाची भीती म्हणून शाळेला सुट्टी देणे, शाळेतील सुट्टीची घंटा होऊन मिळणारा आनंद, मधल्या सुट्टीतील ते खोबरा गोळी, चिंचा, बोर, ते बोरकुट, निरागस मैत्रीतील हवीशी वाटणारी ती मस्ती, हातावरील छड्या, पी टी खो खो खेळणारे ते मित्र मैत्रिणी, पुस्तकात ठेवलेले ते मोरपीस, नव्या कधी नव्हे ते फाटलेले पुस्तक वाचताना पाहिलेली स्वप्न,वहीचा मोहित वास, पाखरांना भर देणारे सर्व शिक्षक, अशा या सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांसहित स्नेह उत्सव साजरा करण्याचे ठरवलं आणि तो साजरा केला. या कार्यक्रमातील विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्र सरकारच्या उच्च पदस्थाधिकार्यांपासून शेतकऱ्यांना चार पुरस्कार मिळवणाऱ्या मध्ये सुद्धा विद्यार्थी उपस्थित होते, विविध विभागात काम करणारी विद्यार्थी, भाऊसाहेब तरबेज असणारे विद्यार्थी सुद्धा कार्यक्रमाला उपस्थित होते. पोलीस मध्ये भरती असणारे अनेक विद्यार्थी या कार्यक्रमात उपस्थित होते.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी, प्राचार्य नंदकुमार काळे, पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव सत्यनारायण सोनी, संस्थेचे उपाध्यक्ष शेख जमीर सर, संस्थेच्या संचालक विश्वनाथ सांगळे सर, संस्थेचे संचालक तथा उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, पंजाबराव सोळंके,अंकुशराव वाघमोडे सर, पवार सर,भास्कर राव चेके सर, लक्ष्मीकांत बुगदाणे सर, धनंजय पुराने सर, चित्रकला शिक्षक संजय कुलकर्णी सर, गणेश संवसाक्के सर, सुनील सकुंडे,माजी प्रयोगशाळा सहाय्यक गोफने सर, शेषराव मुळे सर, शिवाजी जाधव मामा, आजहर मामा, विश्वास लवटे मामा,नागोराव देशमुख मामा,दीपक देशमुख, आदींची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये संस्थेचे सचिव सत्यनारायण सोनी, संस्थेचे उपाध्यक्ष जमीर सर, उप प्राचार्य प्राध्यापक दत्ता देशमुख, भास्कर चेके,विश्वनाथ सांगळे, सावसक्के, पुराने सर, बोगदाणे सर, वाघमोडे सर, यांची समयोचित भाषणे झाली तसेच काही लोकांशी विद्यार्थ्यांनी आवर्जून संवाद साधला. या कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये डॉक्टर रवी गोपने, संजय गायकवाड, धनश्री वराडे, उत्तम देशमुख, गोविंद देशमुख, जितू माघाडे, विजय मुळे यांनी विशेष भूमिका बजावली. या कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती, सविता देशमुख, फरहात खान, आशा माघाडे, शंकर सवडे, विजय मुळे, शरद गायमुखे, किशोर कासारे दीपक शिंगणे सुनील मोकाशी, दक्षिण उखर्डे, संतोष सांगोळे, शैलेश वाघमारे सुरेश उखर्डे, डॉक्टर रवींद्र गोफणे, आशा नवल ज्योती निकाळजे,वंदना जाधव, निर्मला धनवई,विद्या जयस्वाल, गजानन सांगोळे, दत्ता धारे,शरद गायमुखे ठखसेन उखर्डे,संतोष पंजाबराव, पुंजाराम कुदळे, के के सवडे सुरेश धनवाई, शिवकुमार देशमाने, गंभीर नवले, श्रीमंत सवडे सुभाष नवले, गजानन नवले दीपक नवले, नारायण जमदाडे भगवान घोडके, धोंडीराम जाधव सूर्यभान डुकरे, गजानन मिसाळ दिनेश विदुर, देविदास डहाके शेख मुस्ताक, शेख अफसर सारंग कांबळे,शेख अहमद, शंभू काकडे पंढरीनाथ जंजाळ, सुनील आढावे गणेश मस्के, शंकर सवडे सुरेश उखर्डे, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गायकवाड व डॉक्टर रवी गोपने यांनी केले आभार प्रदर्शन सतीश उखर्डे यांनी केले. विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होऊन मनसोक्त आनंद लुटल्यानंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

---

### विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केली मतदान केंद्राची पहाणी





**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाकडून भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंमलबजावणी सुरु आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध असाव्यात यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज १०१-जालना विधानसभा मतदार संघातील स्वामी विवेकानंद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, श्री सरस्वती भुवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, फातेमा उर्दू हायस्कूल, शांतिनिकेतन विद्यामंदिर आणि कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृह या मतदान केंद्रांना प्रत्यक्ष भेट देवून येथील सोयी-सुविधांची पाहणी केली.

यावेळी पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, मनपा आयुक्त संतोष खांडेकर आदीची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, मतदान केंद्रावर मूलभूत सुविधा पुरविणे ही संबंधित विभागाची जबाबदारी आहे. सर्व अधिकऱ्यांनी स्वतः मतदान केंद्राना भेटी देवून पाहणी करून मुलभूत सुविधांच्या उपलब्धतेची खात्री करावी. आवश्यकतेनुसार तात्काळ डागडुजी व दुरुस्ती करुन घ्यावी. सर्व मतदान केंद्रांवर प्रकाशाची व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छता गृहे, रॅम्प आदींची व्यवस्था करण्यात यावी.

वेब कास्टिंगसाठी निवडलेल्या मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधांची खात्री करावी. मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग, सीसीटीव्ही किंवा व्हिडिओग्राफीसाठी आवश्यक ती व्यवस्था करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. ज्या मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदार मतदान करतील तेथे व्हीलचेअर व स्वयंसेवकांची व्यवस्था करण्यात यावी. आयोगाच्या सूचनानुसार आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना डॉ. पांचाळ यांनी यावेळी दिल्या.

तसेच जिल्ह्यातील आदर्श मतदान केंद्र सुसज्ज असावीत. कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये. यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी. मतदान केंद्रावर मतदारांना बसण्यासह सावलीची व्यवस्था करावी. मतदान केंद्रावर प्रथमोपचार सुविधा देतांना सोबत एक आरोग्य कर्मचारी अधिकारी नियुक्त करुन, आवश्यक ती सर्व औषधे मतदान केंद्रावर ठेवण्याच्या सूचना ही डॉ. पांचाळ यांनी यावेळी दिल्या.

---

# याला पाडा त्याला गाडा ही कुठली संस्कृती - मुंडे

**पिंपरी -** भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांनी गेल्या दहा वर्षांत समाविष्ट गावांमध्ये अनेक कामे करून दाखवली आहेत. ही कामे केल्यानंतरही केवळ विरोधाला विरोध आणि राजकारणात टिकायचे म्हणून टीका करायची. याला पाडा त्याला गाडा ही कुठली संस्कृती? असा सवाल भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा आमदार पंकजा मुंडे यांनी उपस्थित केला. ''अरे जो काम करतो त्याला निवडून आणण्याचा सर्वस्वी अधिकार नागरिकांचा आहे. काम करणाऱ्या माणसाला राजकारणात टिकून ठेवण्याची जबाबदारी जनतेची नाही का? असे सवालही त्यांनी यावेळी नागरिकांना उद्देशून केला. महायुतीच्या भोसरी विधानसभा मतदार संघाचे भाजपाचे उम ेदवार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ दिघी येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पंकजा मुंडे बोलत होत्या. आम दार पंकजा मुंडे म्हणाल्या की, या सभेला येण्यापूर्वी मी या मतदारसंघाची माहिती घेत होते. माहिती घेत असताना सध्या विरोधकांकडून सुरू असलेल्या आरोप प्रत्यारोपांची माहिती मिळाली. मात्र महेश लांडगे यांनी गेल्या दहा वर्षात पिंपरी-चिंचवड शहरालगतच्या समाविष्ट गावांमध्ये केलेले काम मी पाहिले आहे. राजकारणात हा सूर्य आणि हा जयद्रथ असेच काम दाखवावे लागते. जे काम महेश लांडगे यांनी केलेले आहे. या विकासाच्या काम ावरच यंदा त्यांची हॅट्रिक निश्चित आहे, असा विश्वास पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.

---

# जालना येथे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना यांच्या वतीने जालना येथे दि.१४ नोव्हेंबर २०२४ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रम ात युवक व युवतींसाठी स्वतःचा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योग या बाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे.या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे,कच्चा माल,साहीत्य,कॅप्रीसिटी,जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीम त्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निम शासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योगांच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, राष्ट्रीय पशुधन योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी ,मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.१४ नोव्हेंबर २०२४ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन के डी दांडगे मिटकॉन जालना यांनी केले आहे.

---


परिशिष्ट ४७

फॉरमॅट्स सी-१ ते सी-८ आणि सीए / सी-१ फॉरमॅट

**गुन्हेगारी प्रकरणांबद्दल घोषणा** (वृत्तपत्र, टिव्हीवर प्रकाशित करण्यासाठी उमेदवारासाठी)

(२०११च्या व्हीपी (सिव्हील) क्रमांक ५३६ (सार्वजनिक) इंटरेस्ट फाऊंडेशन आणि ओआरएस वि. भारतीय संघ आणि एएनआर.)

उमेदवाराचे नाव व पत्ता : **ॲड. भास्कर बन्सी मगरे, नंदनवन कॉलनी जालना.**

राजकीय पक्षाचे नाव : **अपक्ष**

निवडणुकीचे नाव : **विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४**

मतदार संघाचे नाव : **१००- घनसावंगी विधानसभा मतदारसंघ**

मी **ॲड. भास्कर बन्सी मगरे** (नावाच्या उमेदवार) वर नमुद केलेल्या निवडणुकीसाठी उमेदवार घोषित करा माझ्या गुन्हेगारी पुर्ववृत्तांबद्दल सार्वजनिक माहितीसाठी खालील तपशिल

**(अ) प्रलंबित फौजदारी खटले**

| क्र.नाही | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक आणि दिनांक | केसची स्थिती | विभाग (ले) संबंधित कायदे आणि गुन्ह्याचे संक्षिप्त वर्णन |
|---|---|---|---|---|
| **एससीसी/११४३/२०२१** | **प्रथम न्यायदंडाधिकारी-४ जालना** | **एससीसी/११४३/२०२१ दिनांक १९-०६-२०२१** | **प्रलंबित** | **आयपीसी ३४१, १४३, १४९** |
| **एससीसी/९९४/२०१९** | **प्रथम न्यायदंडाधिकारी-२ जालना** | **एससीसी/९९४/२०१९ दिनांक १५-०४-२०१९** | **प्रलंबित** | **आयपीसी १४३, १४९, ३४** |

**(ब) फौजदारी गुन्ह्यांसाठी दोषी ठरलेल्या प्रकरणांबद्दल तपशिल**

| क्र. नाही | न्यायालयाचे नाव व आदेशाची तारीख (तारिख) | कार्यालय(चे) आणि शिक्षेचे वर्णन लादलेले | कमाल शिक्षा लागू |
|---|---|---|---|
| **निरंक** | **निरंक** | **निरंक** | **निरंक** |
| **निरंक** | **निरंक** | **निरंक** | **निरंक** |

कुंभेफळ येथील कार्यकर्ते शिवसेनेत

# मी पुढचा कॅबिनेट मंत्री असेल - खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** आता लवकरच जिल्हा परिषद आणि महानगर पालिका, नगर पालिकेच्या निवडणूका होणार आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागले पाहिजे. मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे हे हवे असतील तर मला आमदार करणे गरजेचे आहे. मी आमदार झाल्यानंतर राज्याचा कॅबिनेट मंत्री नक्कीच होईल, असा विश्वास महायुतीचे (शिवसेना) उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी व्यक्त केला.

यावेळी कुंभेफळ येथील तंटामुक्ती अध्यक्ष गोविंद गाडेकर, काँग्रेस कार्यकर्ते कडुबा गाडेकर, जनार्दन गाडेकर, मिलींद गाडेकर यांनी अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला.इंदलकरवाडी, वाघ्रुळ, कुंबेफळ (सिंदखेड) आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्यालयास भेटी दिल्या. यावेळी श्री. अरविंदराव चव्हाण, अण्णासाहेब चित्तेकर, शंकुतलाताई कदम, अनवर मिर्झा बेग, प्रभाकर देवंदे, रिकंल तायड, वंदना खांडेभराड, सतीश वाहुळे, संतोष ढेंगळे, उमेश मोहिते, विजू सोनणे, पद्माकर हंडे, किशोर सवडे, शितला भारुडे, विष्णू घुले, विष्णू भुतेकर, तसेच संतोषराव मोहिते, श्री. कपूर आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना श्री. अर्जुनराव खोतकर म्हणाले की, येथील गर्दी पाहून निश्चितच वाटते की, आपला विजय नक्कीच आहे. परंतू आपल्याला गाफील राहुन चालणार नाही, रात्र सुध्दा वैर्याची आहे. येणार्या वीस ताखरेला विधानसभेची निवडणूक पार पाडणार आहे. याच निवडणूकीसंदर्भात मी तुमच्याकडे आलेलो आहे. आपण सत्तेवर नसतांनाही आपण वाघ्रुळच्या देवी मंदिर रस्त्यासाठी पंधरा लाख रुपये दिले, मुस्लीम वस्तीत जाणार्या रस्त्यासाठी दहा लाख रुपये दिले. त्याचबरोबर गणपती, सावता आणि महादेव मंदिरासाठी सुध्दा पंधरा लाख रुपये दिले आहेत. त्यामुळे धनुष्य बाणासमोरील बटण दाबून मला प्रचंड मतांनी विजयी कराल, यात शंका नाही. आपल्याकडे सत्ता नसतांनाही आपण एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी देऊ शकतो तर सत्ता हाती आल्यानंतर तर पाहयचेच काम नाही. गावातील शाळेचे बांधकाम केले, बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभागृहासाठी दहा लाख रुपये दिले, असे असतांनाही तो आयत्या बिळावरील नागोबा म्हणतो, मी आणले, ते केले, प्रतंत तर काहीच काम केले नसते. असे सांगून ते म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी बीज बिल कजार्;तून मुख्त केले आहे. केंद्राची नमो शेतकरी योजनेमध्ये शेतकर्यांना सहा हजार रुपये मिळत होते ते मुख्यमंथत्र्यंनी बारा हजार केले. मुख्यमंत्री म्हणून एकनाथराव शिंदे यांना त्या खुर्चीवर बसवण्यासाठी मला आमदार करणे गरजेचे आहे, त्याशिवाय दुसरा पर्याय नाही. कुंबेफळ (सिंदखेड) येथे बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, कुंभेफळ गावातीलमडळीनी माझ्यावर खूप प्रेम केले आहे. आपल्या गावातील ओढे- नाले अरुंद होते, त्यावर बंधारे घतले. ते मी स्वत: रुंद करुन दिले. प त्यामुळे आपल्या गावचे पाणलोट क्षेत्र वाढले आहे. गावाला गणपती सभा मंडप दिलेला आहे. पेय जल योजना दिली. त्यामुळे गावातील पाण्याची समस्या सुध्दा सुटली आहे, असेही शेवटी श्री. खोतकर म्हणाले.



# घनसावंगीतील जनतेचा परिवर्तनासाठी उठाव!



## अपक्ष उमेदवार सतीश घाटगे यांची प्रचारात आघाडी; राजकीय पक्षांचा प्रचार अद्याप थंड बस्त्यात

**घनसावंगी । प्रतिनिधी -** विधानसभा मतदारसंघाची निवडणूक ऐतिहासिक वळणावर जात आहे. घनसावंगी मतदार संघात प्रत्येक विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी विरुद्ध शिवसेना अशी लढत या मतदारसंघात होत आलेली आहे. मात्र, यावेळी भारतीय जनता पक्षाचे सतीश घाटगे यांनी अपक्ष उमेदवारी दाखल करुन बंडखोरी केली मात्र, या बंडखोरीला सतीश घाटगे समर्थकांकडून बंडखोरी नव्हे हा उठाव केला असल्याचे ठासून सांगण्यात येत आहे. घनसावंगी मतदार संघात सध्या राष्ट्रवादी आणि शिवसेना अशीच तुल्यबळ लढत होणार असल्याची शक्यता वर्तविली जात होती. मात्र, अद्यापही या दोन्ही पक्षांकडून प्रचारास सुरुवात झाली नसल्याचे चित्र आहे. परिणामी गावोगाव पिंजून काढत असलेल्या अपक्ष उमेदवार सतीश घाटगे यांना ठिकठिकाणाहून प्रतिसाद आणि पाठींबा मिळत आहे.

भारतीय जनता पार्टीचा राजीनामा देत सतीश घाटगे पाटील यांनी जनता आणि कार्यकर्त्याच्या आग्रहाखातर अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केली. शेवटपर्यंत त्यांना माघार घेण्यासाठी महायुतीतील मोठ्या नेत्यांनी प्रयत्न केले. परंतु, त्यांना यश आले नाही. सतीश घाटगे यांनी जनतेला दिलेल्या शब्दांनुसार आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवत जनतेचा उमेदवार म्हणून ही निवडणूक लढवायला सुरुवात केली आहे.

गेल्या दोन दिवसापासून सतीश घाटगे आणि त्यांचा संपूर्ण परिवार घनसावंगी मतदार संघातील गावा-गावांत प्रचार दौरे करत आहे. हे प्रचार दौरे परिवर्तन यात्रा म्हणून सतीश घाटगे करत आहेत. प्रत्येक गावात त्यांना सर्व समाज घटकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. सर्व समाजातून आणि विविध सामाजिक संघटनांचा त्यांना पाठिंबा मिळत आहेत.

घनसावंगी मतदारसंघात राष्ट्रवादी विरुद्ध शिवसेना अशी लढत होत आली आहे. मात्र ह्या वेळेस अपक्ष उमेदवार विरुद्ध प्रमुख राजकीय पक्ष असे असे चित्र तयार झाले आहे. सतीश घाटगे यांनी कुठल्याही संविधानिक पदावर नसताना केलेल्या विकास कामामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये त्यांची प्रतिमा विकसनशील नेतृत्व म्हणून तयार झाली आहे. याच गोष्टीमुळे सतीश घाटगे यांना प्रत्येक गावागावातून प्रतिसाद मिळत असून त्यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. त्यामुळे शिवसेनेचे हिकमत उढाण आणि राष्ट्रवादीचे राजेश टोपे यांचे टेन्शन वाढले आहे.

**जाहीरनाम्याची चर्चा**

निवडणुकीत सर्वच उमेदवार आपला जाहीरनामा प्रसिद्ध करत असतो. त्याप्रमाणे सतीश घाटगे यांनी आपला जाहीरनामा सार्वत्रिक करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यांच्या जाहीरनामा हा वचननामा म्हणून त्यांनी प्रसिद्ध केला असून जाहीरनाम्यातील प्रत्येक शब्द पाळणार अशी हमी त्यांनी जनतेला दिली आहे. त्यांच्या जाहीरनाम्यामध्ये २५ वर्षापासून प्रलंबित असलेले दुष्काळी गावांचे रस्ते, पाणी, वीज , बस सेवा या प्रमुख गोष्टींचा समावेश आहे. त्यांचे विकासाचे विजन घनसावंगी मतदारसंघातील प्रत्येक जनतेमध्ये हिट झाले आहे. या जाहीरनाम्यात जालना तालुक्यासाठी त्यांनी स्वतंत्र नवीन साखर कारखाना, घनसावंगी आणि जालना तालुक्यातील ७२ दुष्काळी गावांना दुष्काळमुक्त करण्यासाठी गुंज उपसा जलसिंचन योजना अशा या महत्वकांक्षी प्रकल्पाची हमी त्यांनी दिली असून त्या कशा सत्यात उतरू शकतात. याची चित्रफित त्यांनी जनतेसमोर मांडली आहे.

## महायुतीचे उमेदवार राजेश खंदारे यांच्या प्रचारासाठी धारावीत कार्यकर्ता मेळावा संपन्न




**धारावी । प्रतिनिधी -** शिवसेना भाजपा महायुतीचे उमेदवार राजेश खंदारे यांच्या प्रचारासाठी धारावीत कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मंचावर मा. खासदार राहूल शेवाळे, आमदार प्रसाद लाड, भाजपा मुबंई जिल्हा अध्यक्ष राजेश शिरवलकर, आर पी आय चे सिद्धार्थ कासारे, भास्कर शेट्टी मनिबालन, उदय नांदे, दिलीप खंदारे, संजय भालेराव तसेच सर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती या मेळाव्याला होती.

या कार्यकर्ता मेळाव्यात वंशवाद हटवा, धारावी वाचवा चा नारा देण्यात आला. राजेश खंदारे यांच्या रूपाने धारावीचे स्थानिक उमेदवार मिळाल्याने ४० वर्ष एक हाती सत्ता गाजवणाऱ्या गायकवाड परिवाराला धारावीतून हद्दपार करण्याचा निर्धार या कार्यकर्ता मेळाव्यात करण्यात आला.या मेळाव्याला सुमारे २हजार सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी हजेरी लावली आणि एक दिलाने राजेश खंदारे यांना निवडून आणायचेचं असा नारा दिला.

## अवैधरित्या तलवार बाळगणाऱ्याविरुध्द स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हयात अवैध धारधार शस्त्रे तलवार बाळगणारे इसमांची माहिती घेऊन कारवाई करणे बाबत मा. पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना व पथकास सुचना दिल्या होत्या. त्यावरुन श्री. पंकज जाधव पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी स्थागुशाचे पथक तयार करुन कारवाई करण्या बाबत मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने दिनांक ०४/११/२०२४ रोजी पोलीस ठाणे अंबड हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना माहिती मिळाली होती की, ईसम नामे घनशाम अंकुश मोरे वय २६ वर्षे, रा. कासारवाडी ता. अंबड जि. जालना हा त्याचे राहते घरी स्वतःचे ताब्यात अवैध रित्या ०२ धारधार तलवार बाळगुन आहे अशी माहिती मिळाल्याने सदर ईसमांचा शोध घेतला असता तो त्याचे राहते घरी कासारवाडी येथे मिळुन आल्याने त्याचे राहत्या घराबाहेर भिंतीलगत तुराट्यामध्ये लपवून ठेवलेल्या अवैध ०२ धारधार तलवारी मिळुन आल्या आहे. नमुद आरोपी विरुध्द पोलीस ठाणे अंबड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा जालना, देविदास भोजणे, सागर बावस्कर, दत्ता वाघुंडे, भागवत खरात, कैलास चेके सर्व स्था.गु.शा. जालना यांनी केली आहे.

# डॉ. रवींद्र गोफने यांची प्रथमच टेंभुर्णीत दिवाळी पाडवा पहाट

## डॉक्टर गणेश चंदनशिवे यांची हजेरी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** दिवाळीनिमित्त अनेक ठिकाणी गाण्यांचा पहाटेचा कार्यक्रम संपन्न होत असतो. दिवाळीच्या आनंददायक वातावरणामध्ये गाण्यांची मैफिल भरलेली असते. टेंभुर्णी नगरीमध्ये गायक कलावंत, तसेच अनेक कलाकार म्हणून टेंभुर्णी मध्ये आहे. मनोरंजनाच्या क्षेत्रामध्ये सुद्धा अनेक दिग्गज टेंभुर्णी नगरात आहे. परंतु डॉक्टर रवींद्र गोपने, यांनी आज वेगळा कार्यक्रम घेऊन टेंभुर्णीकरांना एक वेगळी भेट दिली. टेंभुर्णीकरांना पाडवा काय असतो ते आज समजले. आपल्या आनंददयी वातावरणामध्ये लोकांचे मनशांतीसाठी आणि आनंददायी वातावरण निर्मितीसाठी ही पाडवा पहाट भरविली. प्रसिद्ध गायक टेंभुर्णी चे भूमिपुत्र, डॉक्टर गणेश चंदनशिवे यांनी हजेरी लावून आपल्या गायनाची कला दाखवली. कार्यक्रमांमध्ये, शास्त्रीय उपशास्त्रीय व सुगम मराठी हिंदी गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये राग रागिनी पासून ते मनाला अल्हाददायक वाटणाऱ्या सर्व गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. गायनामध्ये माननीय आत्माराम धुतोंडे, संगीत विशारद पुणे, प्राध्यापक रविकिरण मोरे, स्वर विहार संगीत विद्यालय बुलढाणा, प्राध्यापक अमोल दिशागज, स्वर विहार संगीत विद्यालय बुलढाणा, यांनी यांच्या संचासह या दिवाळी पहाट पाडव्याच्या कार्यक्रमानिमित्त हजेरी लावली, या कार्यक्रमास डॉक्टर गणेश चंदनशिवे, नंदकुमार काळे, लक्ष्मीकांत बुगदाणी,मारोतराव देशमुख विद्यालयाचे मुख्याध्यापक / प्राचार्य समाधान दूनगहू, गुरुदत्त ब्रास बँड चे संचालक छबुराव कांबळे, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात हरिभक्त परायण रघुराम उखर्डे, माजी ग्राम पंचायत सदस्य ज्ञानदेव गोपने, सतीश उखर्डे, संजय कुमार निकम, नसीम शेख, दगडूबा गोफने, प्राध्यापक गोपने, किशोर कांबळे, सिताराम गोपने, प्राध्यापक गोपने, शामराव गोपने, लिंबाजी गोपने, शांताराम पेंटर, सतीश चंदनशिवे, तसेच टेंभुर्णी नगरातील अनेक मान्यवर, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम मारोतराव देशमुख विद्यालय च्या प्रांगणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे आयोजक डॉक्टर रवींद्र गोपने आणि आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की या कार्यक्रमाची संकल्पना माझ्या मनात अनेक दिवसांपासून होती. परंतु तिला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी गावातील मानव सेवा मंडळाचे, गावातील माझ्या प्राध्यापक आणि शिक्षक गणांची, तसेच माझ्या मित्रमंडळीने सहकार्य केल्यामुळे मी हा कार्यक्रम आयोजित करू शकलो. टेंभुर्णीकरांना अशाच पद्धतीच्या अनेक कार्यक्रमांची मेजवानी आपल्याकडून मिळेल व टेंभुर्णीकरांच्या मनोरंजनात भर पडेल आणि आनंददायीक वातावरण निर्माण करण्यात व सामाजिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मी पुढाकार घेणार असल्याचेही डॉ. गोफणे यांनी म्हटले आहे.



## टेंभुर्णीचे भूमिपुत्र डॉ गणेश चंदनशिवे यांची मित्र परिवारात भेट; कवीयत्री पूनम सुलाने यांचीही उपस्थिती

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील भूमिपुत्र डॉ गणेश चंदनशिवे यांनी दिवाळी च्या सुट्टी निमित्त आपल्या घरी टेंभुर्णी येथे दिवाळी साजरी करून सर्व मित्र परिवार यांची भेट घेत जुन्या आठवणी यांना उजाळा देत सुख दुःख व्यक्त केले. भूमिपुत्र म्हणून त्यांचे नांव या मुळे मोठे होत आहे कारण त्या मागे त्यांचे त्याग आणि मेहनत असून येथील सरकारी दवाखान्यात वॉर्ड बॉय ते आज मुंबई सारख्या ठिकाणी एका उच्च शिखर वर आज डॉ गणेश चंदनशिवे यांचे नाव असून तेथील लोककला अकादमी चे प्रमुख सोबत बाजीराव मस्तानी सारख्या प्रसिद्ध चित्रपटात गायन केलेले गीत आणि लोकवंत आणि तमाशा मंडळ मधील सर्वांच्या सुख दुःख साठी अहोरात्र झटणारे म्हणून त्यांचे नाव लोकिक आहे. शहरात दिवाळी निमित्त मोठा लख लखाट असतो मात्र आपण ज्या लोकांना मध्ये लहान चे मोठे झालो आज त्यांच्यात जाऊन सन साजरे करावे असे मला वाटले आणि आईच्या सह वासात राहण्याचा योग आला असे त्यांनी या वेळी आवर्जून सांगितले. त्यांच्या सोबत या वेळी जाफ्राबाद तालुक्यातील प्रसिद्ध कवियत्री सौ पूनम (सिंगल) सुलाने यांची ही उपस्थिती लाभली.यांनी आपल्या कविता जन सामान्य पर्यंत येत असल्याने त्यांची एक वेगळी ओळख तालुक्यात असून त्यांचे कविता संग्रह आज ही महाराष्ट्र मध्ये खूप प्रसिद्ध असून आपल्या कवितेतून त्यांनी आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. या वेळी त्यांच्या सोबत सौ अनिता गणेश चंदनशिवे संजीव सिंगल अलकेश सोमाणी शिक्षक श्री सुधाकर चींधोटे यांची ही उपस्थित होते.



## ९२ लाखांचा ऐवज जप्त

**मुंबई :** निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंतच्या काळात राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत पश्चिम व पूर्व उपनगरात अवैध मद्या वाहतुकीबद्दल २२६ गुन्हे दाखल केले असून आतापर्यंत २२७ जणांना अटक केली आहे. या कारवाईत सुमारे ९२ लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. निवडणुकीला दोन आठवडे शिल्लक असल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई अधिक कडक करण्यात येणार आहे, असे उपनगर अधीक्षक नितीन घुले यांनी सांगितले. मुंबईत येणारे सर्व टोल नाके तसेच वांद्रे, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस या ठिकाणी बाहेरगावाहून येणाऱ्या ट्रेनमधून अवैध मद्या वाहतूक केली जाण्याची शक्यता लक्षात घेऊन गस्त वाढविण्यात आली आहे.

## देळेगव्हाण येथे गट शेती मेळावा उत्साहात, शिवार फेरीतून अनेकांनी जाणून घेतली शेतीविषयक माहिती

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील देळेगव्हाण येथे ॲग्रो इंडिया गट शेती संघाचा मेळावा पार पडला. यावेळी शेतकरी प्रकाश कापसे, विलास पंडित, गोविंदराव पंडित यांच्या शेतातील आंबा फळबागेत सर्वप्रथम शिवार फेरी करण्यात आली. याप्रसंगी केशर आंबा अतिघन लागवड पद्धतीबद्दल गट शेतीचे प्रणेते डॉ. भगवानराव कापसे यांनी मार्गदर्शन केले.

कापूसतज्ज्ञ शास्त्रज्ञ डॉ. सूर्यकांत पवार यांनी कापसावरील सेंद्रिय बोंड आळी नियंत्रणाबाबत मार्गदर्शन केले. सोबतच करावयाच्या सोयाबीन काढणीनंतर रब्बी पीक लागवडीबाबतही त्यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. यावेळी कृषितज्ज्ञ डॉ. एस. एस. माने यांनी कापसाची झालेली बोंडे सड, सेंद्रिय बोंड आळी, स्वच्छ कापूस काढणी व मार्केटिंगबाबत माहिती दिली.

यावेळी डॉ. शरद कापसे, मोतीराम कदम, लक्ष्मण सवडे, राजू घोडके, प्रकाश कापसे, ज्ञानेश्वर मिसाळ, पंढरीनाथ पालोदे, भगवान बनकर, सखाराम कापसे, जानकीराम सूर्यवंशी, संतोष बोर्डे, देविदास कापसे, सुनील बनकर यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती. शिवारफेरीमध्ये परिसरतील अनेक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

# रक्ताच्या नात्यापलिकडे घुगे परिवाराने प्रेम दिले - खोतकर




**जालना । प्रतिनिधी -** रक्ताचे नाते असतेच परंतू त्याही पेक्षा खरे नाते जपण्याचे काम कुणी केले असेल तर ते घुगे परिवाराने केले आहे, असे प्रतिपादन अर्जुनराव खोतकर यांनी यावेळी केले. श्री. खोतकर हे भाऊसाहेब घुगे यांनी आयोजित केलेल्या दिपावली आणि पाडव्यानिमित्त स्नेहमीलन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्यासह भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदरंगे, शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णू पाचफुले, मेघा चौधरी, सत्संग मुंडे, संतोषराव मोहिते, उद्योजक दिपक अंभोरे, बाजार समितीचे संचालक राकेश पवार, राहुल हिवराळे आदींची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार केल्यानंतर कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. पुढे बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, दिपावली- पाडव्यानिमित्त आपल्याला काही संकल्प करायचे असातात. यानिमित्त मीही आपणा सर्वांना शुभेच्छा देतो, सुयश चिंतीतो! एक गोष्ट खरी की, आपला भारत- हिंदुस्थान हा विविधतेने नटलेला आहे. या विविधतेतूनच एकता ही निर्माण होते. दिपावली- पाडव्याचेही तसेच आहे, असे सांगून`ते म्हणाले की, मला तुम्ही आई म्हणून आपल्या समस्या सांगा, अडचणी सांगत जा! त्या सोडविण्याचा मी प्रयत्न करील. शेवटी आपण कोणावर रुसतो? फुगतो? आपल्याच माणसावर, आईवर आपण रुसतो, रागावतो, चिंडतो! आणि रुसणार नाही तर काय! एखाद्याचे काम झाले नाही तर आपल्याला राग येणे सहाजिक आहे, हे मी पण समजू शकतो, म्हणूनच मी नेहमी म्हणतो की, आई मुलासाठी एवढी सुखवेडी असते. खरे तर त्या मुलाला पडल्यानंतर उचलण्यासाठी असते. तर कधी गोड कौतुक करण्यासाठी असते. मला सुध्दा याच भुमिकेत राहयाला आवडेल. मला कल्पना आहे की, आपल्या संकट काळात नेहमीच आम्ही धावून येतो, असे नाही. परंतू नेहमीच मला असेच प्रेम द्या! खारीचा वाटा म्हणून देत चला. खरे तर भाऊसाहेब घुगे हा माझा अलिकडचा कार्यकर्ता परंतू या परीवाने जे प्रेम दिले, ते अनमोल आहे. त्याचे वडील, काका माझे चांगले मित्र होते, जे दिले त्यात खुश राहणारा हा कार्यकर्ता आहे. भाऊसाहेब बद्दल मला प्रसंग आठवतो. सकाळी पावणे आठ वाजता हा कार्यकर्ता माझं मैदान गाजवतो आहे. मी तेथे नसलो तरीही माझा कार्यकर्ता मात्र तेथे आहे, म्हणून मलाही कधी ना कधी तरी तेथे जावे लागते. परंतू तुम्हाला कधीतरी जरा जरी खाली-वर झाले की, तुमची आग तळपायाची मस्तकाला जाते, असे सांगून ते म्हणाले की, क्षमा विरस्य भूषणम्, ही जैन समाजाची शिकवण किमान आपल्या पक्षात तरी राबवायला हरकत नाही, असेही श्री. खोतकर शेवटी म्हणाले.

तत्पूर्वी भाऊसाहेब घुगे यांनी मेळावा घेण्यामागची भूमिका स्पष्ट करुन सांगितली. याप्रसंगी सर्वश्री भांदरंगे, पाचफुले आणि सौ. तुल्हे यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शुभम् टेकाळे यांनी केले. यावेळी जालना बदनापूर, भोकरदन- जाफ्राबाद तालुक्यातील कार्यकर्ते, तसेच महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह सीमाताई खोतकर, माजी नगरसेविका कमल तुल्हे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष कालिंदा ढगे यांच्यासह शिवसेना उपजिल्हाप्रमुख भालचंद्र भोजने संतोषराव मोहिते भूषण भैय्या शर्मा राजेंद्र लाड शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले शिवसेना तालुकाप्रमुख कल्याणराव अवघड भगवान अंभोरे नानासाहेब वानखेडे दत्तात्रय बंगाळे अक्षय पवार अजय कदम अमोल ठाकूर गणेश मोहिते अंकुश पाचफुले कैलास जगताप विजयकुमार दाड महादू गीते हरिभाऊ कापसे अंबादास कोळसकर कैलास दुधाने भगवानराव मदन एकनाथ जायभाय संजय वाघ सौ सीमाताई खोतकर सौ कालींदाताई ढगे,सौ कल्पना घुगे विजयाताई चौधरी सुषमाताई भाकड योगिताताई खोतकर दर्शना ताई खोतकर झोल उज्वलाताई पोखलिया प्रशांत वाडेकर प्रशांत गाडे मनोज शिंदे रामेश्वर शिंदे कैलास गिरी अमोल दाभाडे कैलास खैरे देवा ढाकणे भानुदास राव दिघे दीपक दिघे बाबासाहेब चंद रामेश्वर दराडे विलास तुपे दिनेश बारगजे संदीप दराडे कैलास पालवे डॉ प्रमोद डोईफोडे अमोल कारंजेकर दीपक वैद्य राजू पवार अंकुश गायकवाड यांच्यासह महिला- पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.






हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827
Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com